www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक
# युवक आधार
मराठी

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : १३४ वा मंगळवार दि. २८ जानेवारी २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514

दै. युवक आधार करीता प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापुर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
संपर्क 9220403509 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले श्री. सुरेश आत्माराम भोईर

## शिंदखेडा तालुक्यातील लोहगाव आदिवासी मुलींची प्राथमिक व माध्यमिक आश्रम शाळेत 76वा भारतीय प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरी




**दैनिक युवक आधार**
**जळगाव प्रतिनिधी**
**समाधान पाटील**

**धुळे** :- शिंदखेडा तालुक्यातील लोहगाव येथे श्री आबासाहेब सतिलाल भटा पाटील निवासी व आदिवासी मुलींची प्राथमिक व माध्यमिक आश्रम शाळेत 76वा भारतीय प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष खान्देश सुपुत्र तसेच ( कॅनडा )देशातील ओंटोरीया राज्याच्या ओंटोरीया सेवा पुरस्कार प्राप्त तसेच कॅनेडियन सर्विसेस संस्थेचे अध्यक्ष तसेच कॅनेडियन केअर अँड शहर असोसिएशन ओटावा तसेच हिंदू समुदाय ओटावा (कॅनडा ) चे उपाध्यक्ष आदरणीय दादासो श्री गणेशजी सतिलाल पाटील यांच्या शुभहस्ते ध्वजवंदन करण्यात आले. कार्यक्रमासाठी श्री गणेश फाउंडेशन चे अध्यक्ष श्री आबासो सतिलाल भटा पाटील यांनी मार्गदर्शक म्हणून स्थान स्विकारले तसेच आश्रम शाळेचे सचिव श्री दादासो प्रवीण सतीलाल पाटील हे देखील कार्यक्रमासाठी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री एस. एस. पावरा सर व श्री एच .डी. चौरे सर यांनी केले तसेच कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन श्री ज्ञानेश्वर पाटील सरांनी केले प्रजासत्ताक दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी भाषण केले तसेच शाळेत सांस्कृतिक कार्यक्रमाची रूपरेषा श्री दिनेश वसईकर सर तसेच अमोल पाटील सर उदय पाटील सर यांच्या मार्गदर्शनाखाली संचलन व शहीद जवानांना श्रद्धांजली तसेच विद्यार्थिनींनी लेझीम नृत्य व देशभक्तीपर गीत सादर केले आश्रम शाळेतील मुख्याध्यापक आर.वाय. सोनवणे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच गावातील प्रतिष्ठित ग्रामस्थ कार्यक्रमासाठी उपस्थित होते .

# दैनिक युवक आधारच्या दिनदर्शिकेचा प्रकाशन सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**

दैनिक युवक आधारच्या पहिल्या दिनदर्शिकेचा प्रकाशन सोहळा कार्यक्रमाची सुरूवात छत्रपती शिवाजी महाराज पूजन व बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून दीपप्रज्वलनाने झाली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून खांदेश्वर शहर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक स्मिता ढाकणे मॅडम पनवेल वाहतूक पोलीस वरिष्ठ निरीक्षक संजय पाटील प्रणिता फाउंडेशनच्या संस्थापिका साक्षी सागवेकर दिशा महिला मंचच्या संस्थापिका नीलम दाते आंधळे महिला बचत गटाच्या प्रमुख .स्वप्ना साखरे डॉ. शुभदा निल सामाजिक कार्यकर्ते बबन बारगजे तसेच दैनिक युवक आधारच्या मुख्य संपादिका भारती संतोष आमले याच्या हस्ते करण्यात आला. मागील एक वर्षापासून वृत्तपत्राच्या स्पर्धेत दैनिक युवक आधारची घोडदोड सुरू केली होती दैनिक युवक आधार अति कमी वेळामध्ये महाराष्ट्रामध्ये लोकप्रिय वृत्तपत्र म्हणून नावारूपास आले व फक्त पनवेल मध्ये नसूनच संपूर्ण महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यामध्ये दैनिक युवक आधार हे वृत्तपत्र पोहोचले आहे. या कार्यक्रमादरम्यान जेष्ठ पत्रकार दैनिक युवक चे महाराष्ट्र प्रतिनिधी प्रमुख . प्रदीप






पाटील. लोकमत चे पत्रकार मयूर तांबडे, पनवेल वैभव चे संपादक .अनिल कुरगुडे, रायगड सम्राट संपादक शंकर वायदंडे, पत्रकार.सोनल नलावडे, युथ महाराष्ट्र संपादिका दिपाली पावसकर, पत्रकार आनंद पवार, भारतीय माजी सैनिक समीर दूंद्रेकर. उसर्ली ग्रामपंचायतीचे लेखनिक किरण भगत. श्री दत्तकृपा बिल्डर्स सुरज भगत. दैनिक युवक आधार चे रायगड प्रतिनिधी प्रमुख मनोहर भोईर, पत्रकार राणिता ठाकूर, पत्रकार सायली साळूंके, पत्रकार आरती सुरवसे, पत्रकार उमाकांत पानसरे, दैनिक युवक आधार चे कार्यकारी संपादक सुरेश भोईर, उपसंपादक विलास गायकवाड, खूप सहसंपादक मुकुंद कांबळे, निवासी संपादक राकेश पाटील, कोकणी विभाग प्रतिनिधी प्रमुख विजय दूंदरेकर, पनवेल तालुका प्रतिनिधी निजाम सय्यद, संपादक संतोष आमले आधी उपस्थित होते दैनिक युवक आदर्श संपादक संतोष आमले यांनी आपल्या प्रास्ताविकात पत्रकारितेची मूलभूत तत्त्वे, तिची प्रभावीता आणि समाजातील महत्त्वाची भूमिका यावर प्रकाश टाकला. त्याचप्रमाणे आपल्या वृत्तपत्राच्या माध्यमातून युवा वर्ग तसेच सामाजिक सर्व स्तरावरील बातम्यांना न्याय देण्यास कटिबद्ध राहतील अशी यावेळी त्यांनी ग्वाही दिली कार्यक्रमाचे प्रास्ताविक दैनिक युवक आधारचे संपादक संतोष आमले यांनी केले . तर सूत्रसंचालन पूर्णा पाटील यांनी केले. आभार प्रदर्शन सुरेश भोयर कार्यकारी संपादक यांनी केले कारण यशस्वी होण्यासाठी दैनिक युवक आधारच्या प्रतिनिधीने विशेष परिश्रम घेतले.

# तळा कॉलेज व तहसीलच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त जनजागृती

**दैनिक युवक आधार**
**तळा प्रतिनिधी**

दरवर्षी २५ जानेवारी हा दिवस राष्ट्रीय मतदार दिवस म्हणून साजरा केला जातो याच अनुषंगाने तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाच्या कला वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, द. ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना, डी. एल. एल. इ. विभाग व तहसील कार्यालय तळाच्या संयुक्त विद्यमाने आणि जी एम व्ही इंजिनिअरिंग व सायन्स कॉलेज यांच्या सहकार्याने पोस्टर, निबंध, घोषवाक्य, रांगोळी स्पर्धा तसेच प्रभात फेरी आणि पथनाट्याचे आयोजन करण्यात आले होते.

दि. २५ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ८.३० वाजता महाविद्यालय ते बाजारपेठ पर्यंत प्रभात फेरी काढण्यात आली. यासह आपला अधिकार मतदान यासाठी मतदारांसाठी प्रतिज्ञासुद्धा घेण्यात आली. मतदान जनजागृतीचे फलक




घेऊन विद्यार्थ्यांनी तळा शहरातील बाजारपेठेत प्रभातफेरी काढून मुख्य बाजारपेठेमध्ये पथनाट्य सादर केले. या प्रभात फेरीमध्ये तहसीलदार स्वाती पाटील, नायब तहसीलदार श्री भरत जाधव, शिक्षक, विद्यार्थी, पालक, कर्मचारी व स्थानिक नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. यावेळी तळा तहसिलदार स्वाती पाटील मॅडम यांचा १९३ श्रीवर्धन मतसंघात सहाय्यक निवडणूक अधिकारी म्हणून उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल अभिनंदन करण्यात आले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षक प्रतिनिधी प्रा द्यानेकर बी एन, प्रा नितीन पाटील, प्रा कसबे पी पी, प्राध्यापिका कुळकर्णी बी एस, प्रा सर्जे व्ही बी, प्रा आंबेगावे डी टी, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. दत्ता कुंटेवाड, डॉ. सचिन बंगाळे ग्रंथपाल श्रेयश रोडे आणि आजीवन अध्ययन व विस्तार विभाग प्रमुख डॉ.राजाराम थोरात आदी प्राध्यापक व प्राध्यापकेत्तर कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

# विचुंबे ग्रामपंचायत व रा.जि.प. शाळा येथे प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**
**सुरेश भोईर (कार्यकारी संपादक)**

26 जानेवारी 74 प्रजासत्ता दिन विचुंबे ग्रामपंचायत येथे सरपंच प्रमोद भिंगारकर यांच्या हस्ते ध्वजारोहणाचा कार्यक्रम पार पडला व जिल्हा परिषद शाळेत विचुंबे ग्रामपंचायत सदस्य अनंता गायकवाड यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. शाळेतील विद्यार्थिनी देशभक्ती गीत गाऊन कार्यक्रमाला शोभा आणली. यावेळी ग्रामसेवक गणेश गायकर. उपसरपंच स्वाती पाटील. सदस्य समीर दूंद्रेकर. अनिल भोईर.सतीश म्हात्रे.अतुल भोईर. भरत पाटील. सुनील सोनवणे.धनश्री भोईर. श्रावणी भोईर. संचिता पाटील. प्रगती गोंधळी.आरती गायकवाड. विभूती सुरते. करुणा म्हात्रे.माजी सरपंच वासुदेव भिंगारकर.रवींद्र भोईर. एकनाथ भोईर. यांच्यासह सदस्य गावातील नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते








# लायन्स क्लब ऑफ पनवेलतर्फे डायलेसिस सेंटरचे उद्घाटन डॉ. प्रभाकर पटवर्धन स्मृती हॉस्पिटलमध्ये संपन्न


दैनिक युवक आधार
सुरेश भोईर )कार्यकरी संपादक ) दिनांक 26 जानेवारीला ७६ प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने लायन्स क्लब ऑफ पनवेल चॅरिटेबल संस्थेमार्फत प्रायोजक लायन डॉ. संजय पोतदार व अध्यक्ष ला.एस.जी चव्हाण. सेक्रेटरी लायन अशोक गिल्डा व लायन्स क्लबचे इतर सभासद यांच्या मदतीने आणि डॉ. प्रभाकर पटवर्धन स्मृती रुग्णालय यांच्या सहकार्याने डायलॉसिस सेंटरचे उद्घाटन सारंभ नुकताच पटवर्धन हॉस्पिटलमध्ये पार पडला आहे लायन्स क्लबचे प्रमुख अतिथी प्रांतपाल लायन एन.आर. परमेश्वरन मल्टिपल कौन्सिल चेअर पर्सन ला. अमरचंद शर्मा. पी.डी.जी.ला. सुरेंद्र शर्मा फाउंडर चेरपर्सन लायन हॉस्पिटल कोपरखैरणे प्रथम प्रांतलाल ला. संजीव सूर्यवंशी. द्वितीय प्रांतपाल प्रवीण सरनाईक. डी.सी. जी.एस. टी लायन विजय गणत्रा. स्पॉन्सर लायन संजय पोतदार. रिजन चेअर पर्सन ला. सुयोग पेंडसे अध्यक्ष ला.ए जी चव्हाण. सर्व इतर मान्यवर आणि आर ए एस एस जनकल्याण समितीचे डॉक्टर प्रभाकर पटवर्धन स्मृती रुग्णालयाचे अध्यक्ष डॉक्टर कीर्ती समुद्रा प्रदीप पराडकर खजिनदार महाराष्ट्र प्राण व इतर ट्रस्टी आणि संचालक यांच्या हस्ते डायलिसिस सेंटर चे उद्घाटन करण्यात आले. लायन्स क्लब ऑफ पनवेल चे







अध्यक्ष ला. एस जी चव्हाण यांनी आपल्या प्रस्ताविकात सांगितले की डॉक्टर पटवर्धन हॉस्पिटल आणि लायन्स क्लब या दोघांची उद्दिष्ट हे एकच आहे.गोरगरिबांना माफक दरात चांगली आरोग्यसेवा उपलब्ध व्हावी या हेतूने लायन्स क्लब ऑफ पनवेल पटवर्धन हॉस्पिटलची जोडला गेला आहे.आणि त्यांचे डायलिसिस सेंटरला अद्यावत करण्यासाठी लायसन्स क्लब पनवेलने मदत केली. त्यामध्ये पी एम जी एफ लायन डॉक्टर संजय पोद्दार यांचा त्यामध्ये मोलाचा वाटा आहे. डॉक्टर कीर्ती समुद्रा यांनी आपल्या भाषणात सांगितले आहे की पनवेल मध्ये हे पहिलेच डायलेसिस सेंटर आहे. आणि डायरेक्ट सेंटर हा पहिला होताच पण आता ते नव्याने बांधल्याने स्टाफला काम करण्यास प्रसन्न वाटते. आणि पटवर्धन हॉस्पिटलच्या सर्व डॉक्टर आणि स्टाफ साठी आजचा दिवस हा खूप आनंदाचा दिवस लायन्स क्लब ऑफ पनवेलमुळे आम्हाला दिसत आहे. तसेच सर्व रुग्णांना दर्जेदार आरोग्यसेवा आम्ही देतच आहोत आणि यापुढेही देऊ असे त्यांनी सांगितले. प्रदीप पराडकर खजिनदार महाराष्ट्र प्रांत. यांनीही त्याच्या विविध नऊ प्रोजेक्ट बद्दल सविस्तर सांगितले. लायन संजय पोद्दार यांनी म्हटले आहे की त्यांची हॉस्पिटल बांधण्याची खूप तळमळ होती.आणि त्यांची सुरुवात आज झाली आहे. याचा आम्हाला खूप आनंद झाला आहे.तसेच सर्व तळागाळातील गरीब आणि गरजू लोकांना अत्यंत योग्य दरामध्ये ही सेवा मिळेल. आणि त्याचा फायदा त्यांना होईल.आणि त्याने म्हटले की पनवेलच्या गरजू लोकांना आम्ही चांगली सेवा देण्याचा प्रयत्न करू आणि डिस्टिक कडून आम्हाला सहकार्य राहील. प्रांतपाल 32 31 ए 4 लायन्स एन आर परमेश्वरन मल्टिपल कौन्सिल चेअर पर्सन 32 31 लाईन अमरचंद शर्मा, सुरेंद्र शर्मा, लायन हॉस्पिटलचे कोपरखैरण्याचे फाउंडेशन चेअर पर्सन क्लब ऑफ पनवेल चे लायन संजय पोतदार व पनवेल क्लबचे अध्यक्ष लायन ए जी चव्हाण यांनी केलेल्या कामाची कौतुक केले. आणि पनवेल क्लबला सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. आणि यापुढे ते करत राहतील.जेणेकरून भविष्यामध्ये प्रवेश लक्ष मल्टिपल हॉस्पिटल मानस आहे. आर एस एस जनकल्याण समितीचे अध्यक्ष कीर्ती समुद्रा व इतर मान्यवरांनी लायन्स क्लब ऑफ पनवेलने दिलेल्या सहकार्याबद्दल आभार मानले. आणि भविष्यात पण त्याच्या सहकार्याने अनेक प्रोजेक्ट राबवू. हा उपक्रम राबवण्यासाठी डॉक्टर प्रभाकर पटवर्धन हॉस्पिटलचे चीप ऑपरेटिंग मॅनेजर श्री सुनील लगाटे आणि आर एस एस समितीचे पदाधिकारी श्री राजू समेल यांचा मोलाचा वाटा आहे. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉक्टर भक्ती सारंग मेडिकल सुप्रिटेन्ट व मिसेस अनुराधा ओगळे यांनी केले. या समारंभामध्ये प्रमुख पाहुणे म्हणून एम जे एफ लायन एन आर परमेश्वरन डिस्ट्रिक्ट गव्हर्नर 32 31 ए 4 तसे विशेष अतिथी लायन अमरचंद शर्मा मल्टिपल कौन्सिल चेअर पर्सन एम जे एफ लायन सुरेंद्र शर्मा तसे प्रथम प्रांतपाल लायन संजू सूर्यवंशी,द्वितीय प्रांतपाल, प्रवीण सरनाईक, डीजीसीएसटी लाईन विजय गणतरा,स्पॉन्सर लायन संजय पोतदार,रिजन चेअर पर्सन लायन सुयोग पेंडसे,अध्यक्ष लाईन ए जी चव्हाण,सेक्रेटरी लायन अशोक गिलडा, खजिनदार लाईन मनोज म्हात्रे, लायन सुरभी पेंडसे, लाईन मदन गोवारी, लाईन नागेश देशमाने, लाईन ज्योती देशमाने, ला. लुईस कोलास्को, ला. मंगळ ठाकूर, ला.अमित पोद्दार, ला. गायत्री पोद्दार, ला.मिलिंद सूर्यवंशी, ला. मधुकर भगत, ला. शकुंतला भगत, ला. जितेंद्र मालिक, लायन योगेश चव्हाण, लायन संगीता म्हात्रे, ला. आनंद परदेशी,लायन सुरेश गाडगे,लाईन ज्योती भुतडा,व इतर सभासद तसे लिओ सभासद उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी पनवेलचे नामांकित डॉक्टर दीपक कुलकर्णी, व डॉक्टर ययाती गांधी, व इतर डॉक्टर जातीने हजर होते. लायन्स क्लब ऑफ पनवेल चे अध्यक्ष ला. एस जी चव्हाण व सेक्रेटरी लायन्स अशोक गिलडा यांनी समितीचे पदाधिकारी आणि हॉस्पिटलचा स्टाफ व डॉक्टर्स त्यांच्या सहकार्याबद्दल आभार मानले. आणि तसे सहकारी राहील अशी अपेक्षा व्यक्त केली.



## हुमाना सेवाभावी संस्थे तर्फे स्वच्छता, आरोग्य व आहारा बाबत जनजागृती शिबीर




**दैनिक युवक आधार**
**खोपोली :-वार्ताहर**

हूमाना पीपल टू पीपल इंडिया प्रोजेक्ट निरामय मुंबई -खोपोली सेवाभावी संस्था आरोग्य जनजागृती वर सक्रियरित्या खोपोलीमध्ये काम करीत आहे. महिलांच्या आरोग्याचे गटसमूह तसेच किशोरवयीन मुलींच्या आरोग्याचे गट तयार करून त्यांना आरोग्य विषयी जनजागृती करून त्यांच्या समुदयामध्ये प्रचार ,प्रसार सतर्कता असावी या उद्देशाने असंसर्गजन्य रोगा बाबतीत रॅली काढण्यात आली. तसेच माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना वैयक्तिक स्वच्छतेवर मार्गदर्शन करण्यात आले खोपोली परिसरात असंसर्गजन्य रोगावर कार्य तसेच स्वास्थ शिबिराचे आयोजन दिनांक 25 जानेवारी रोजी शिळफाटा येथील यशवंत नगर मध्ये राजगिरी बुद्ध विहार या सभागृहात वैयक्तिक, स्वच्छता ,आरोग्य ,आहार बाबतीत सविस्तर विषयावर प्रशिक्षण सत्र आयोजित करण्यात आले होते. मुलींसोबत प्रत्यक्षरीत्या संवाद ,चर्चा करून त्यांना मार्गदर्शन देण्यात आले . या प्रशिक्षण सत्रात यशवंत नगर मधील अनेक किशोरवयीन मुलींनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला .मुलींना स्वास्थ हेतू सांगून सॅनेटरी पॅडचे वाटप ही या निमित्ताने करण्यात आले अशा अभिनव उपक्रमातून जनजागृती मार्गदर्शन करीत हुमाना सेवाभावी संस्थेचे कार्य खोपोली शहरात होत असलेल्या कार्यक्रमाचे नागरिकांनी कौतुक केले.

## नॅशनल हवेवरील स्वत:च्या पैशाने खर्चाने रिक्षा चालकांनी बुजवले खड्डे .

**दैनिक युवक आधार**
**--संतोष पुदाले**
**तुळजापूर धाराशिव**



सोलापूर ते हैदराबाद नॅशनल रोडवरील नळदुर्ग येथील अंकुर हॉटेल समोरील हवे वरील स्टेट लाईट लावण्यासाठी ठेकेदाराने आडवी लांबलचक खड्डे मारल्यामुळे गेल्या सहा महिन्यापासून खड्ड्यामुळे होणारा होणारा त्रास मोटरसायकल वाहनचालकांना तसेच रिक्षा चालकांना फार मोठा त्रास सहन करावा लागत होता त्यामुळे दि.२६ जानेवारी रोजी नळदुर्ग येथील एकता ऑटो रिक्षा संघटनेचे सदस्य निजाम शेख बाबू शेख शाहनवाज शेख या रिक्षा चालकाने स्वतःच्या पैशाने खड्डे बुजून माणुसकीची दर्शन घडविला आहे तसेच यावेळी रिक्षा चालकांनी ज्या ठेकेदाराने स्टेट लाईट साठी खड्डे मारणाऱ्या ठेकेदारावर कारवाई करण्यात यावे अशी यावेळेस मागणी केली आहे या तिघांचे नागरिकातून कौतुक केले जात आहे

## CSMS –DEEP कोर्ससाठी प्रवेश घेण्याचे आवाहन

**दैनिक युवक आधार**
**रोहा/ रायगड**



एमकेसीएल व सारथी यांच्या संयुक्त विद्यमाने तयार झालेला कुणबी व कुणबी मराठा, मराठा या समाजासाठी असलेला सीएसएमएस दीप हा कोर्स सिद्धराज कम्प्युटर इन्स्टिट्यूट मध्ये सुरू आहे .तरी त्याची माहिती सांगणारे चावडी वाचन काल दिनांक 26 जानेवारी 2025 रोजी सारसोली तालुका रोहा जिल्हा रायगड या ठिकाणी झालेल्या ग्रामसभेत सारसोली ग्रामस्थांचा उपस्थितीत करण्यात आले .हे चावडी वाचन सिद्धराज कॉम्पुटर इन्स्टिट्यूट ची सीएसएमएस या कोर्सची विद्यार्थिनी रोशनी रामचंद्र गंभे गाव खैराळे यांनी केले .तसेच त्याची रीतसर माहिती सिद्धराज कम्प्युटर इन्स्टिट्यूट चे संचालक सिद्धेश चंद्रकांत रणदिवे यांनी दिली यावेळी सारसोली ग्रामपंचायतच्या ग्रामसेविका राधिका चंद्रकांत जाधव व ,ग्रामस्थ मान्यवर उपस्थित होते.

# तळेगाव गावात म्हसोबा यात्रा उत्सवाला सुरुवात

**दैनिक युवक आधार**
**कल्याण/रशीद शेख**

मुरबाड तालुक्यातील तळेगाव या गावात २५ जानेवारी २०२५ ते २७ जानेवारी २०२५ कालावधीत ग्रामदैवत आई श्री गावदेवी व श्री म्हसोबा यात्रा उत्सव २०२५ या यात्रा उत्सवाला कालपासून सुरुवात झाली आहे. २५ ते ते २७ जानेवारी यादरम्यान या यात्रा उत्सवामध्ये विविध प्रकारच्या धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. श्रींची महापूजा, महाआरती, हळदी कुंकू समारंभ, हरिभक्ती पारायण प्रभाकर महाराज कुटे यांचे संगीत भारूड, देवीची पालखी, छबिना मिरवणूक, ग्राम प्रदक्षिणा, महाप्रसाद, साईकृपा भजन मंडळ तळेगाव यांचे जागर भजन तर उद्या



२७ जानेवारी २०२५ रोजी स्वरसम्राज्ञी शकुंतला चव्हाण नगरकर लोकनाट्य तमाशा मंडळ संगमनेर यांचा लोकनाट्य तमाशा या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या संपूर्ण यात्रा उत्सवाचे व्यवस्थापन आई श्री गावदेवी व म्हसोबा देवस्थान सेवा समिती व ग्रामस्थ मंडळ तळेगाव आणि परिसर करत आहेत. या म्हसोबा यात्रेला एक आगळे वेगळे महत्त्व आहे. या यात्रा उत्सवामध्ये घोंगडी, लहान मुलांची खेळणी, खाद्यपदार्थ, मिठाई, पाळणे अशी अनेक प्रकारची दुकाने थाटलेली आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून ही म्हसोबाची यात्रा या गावात भरत होती. मधल्या काळात ती बंद होती . मात्र आता गावकऱ्यांच्या सहकार्याने मोठ्या धार्मिक वातावरणात ती सुरू झाली गेल्या अनेक वर्षांपासून या यात्रा उत्सवाच्या निमित्ताने कबड्डीचे सामने, कुस्त्यांची परंपरा येथे बघायला मिळत होती. पुढील वर्षी पुन्हा एकदा कबड्डी आणि कुस्त्यांचे सामने सुरू होणार आहेत. अशी माहिती यावेळी गावकऱ्यांनी दिली.घोंगड्यांच्या बाजारासाठीही ही यात्रा प्रसिद्ध आहे. २५० वर्षानंतर म्हसोबाचे आपल्या जुन्या गावी तळेगाव येथे पुनरागमन झाले अशी आख्यायिका सांगितली जाते . मुरबाड, कल्याण तसेच ठाणे जिल्ह्यातील आणि महाराष्ट्रातील अनेक भाविक भक्तगण या यात्रा उत्सवामध्ये सहभागी झाले आहेत. एका बाजूला आजोबाचा डोंगर, एका बाजूला हरिचंद्र गड, एका बाजूला नाणेघाट आणि तेथूनच नजीक असलेलं जळगाव गावातील म्हसोबाचे मंदिर येथे पाहायला मिळते. अनेक भाविक भक्तगण म्हसोबाच्या दर्शनाला येतात. भाविकांनी या यात्रा उत्सवात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आव्हान येथील गावकऱ्यांनी केले आहे.

## जोगेश्वरी (पूर्व) येते प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**
**किशोर गुडेकर**
**जोगेश्वरी (पूर्व):**

श्री साई सिद्धी मंदिराचे अध्यक्ष महेंद्र केळकर आणि सेक्रेटरी विवेक दळवी यांच्या सहमतीने तसेच सौ. साक्षीका संजय प्रियोळकर, पिंकी परमार, दीपिका ठाकूर, प्रियंका सुर्वे, सोनू चव्हाण, वनिता कतपरा, मिता सुमेसरा, सलोनी विचाले, सपना श्रीवास्तव पिंकी मकवाना. यांच्या नेतृत्वाखाली रा. स्व. संघ जनकल्याण समिती (महाराष्ट्र प्रांत) संचालित वस्ती परिवर्तन योजना, मुंबई महानगरात प्रजासत्ताक दिनाचा कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात भारत माता प्रतिमेच्या पूजनाने झाली. त्यानंतर राष्ट्रध्वज वंदन करण्यात आले आणि देशभक्तिवर गीते सादर करण्यात आली. वस्तीतील मुलं / मुली आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली. श्री साई सिद्धी मंदिर आणि जनकल्याण समितीच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम यशस्वीपणे राबवला गेला. या कार्यक्रमाद्वारे नागरिकांमध्ये राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश पोहोचवण्यात आला. कार्यक्रमाचा समारोप मिष्टान्न वाटपाने करण्यात आला.




## निफाड महाविद्यालयात 76 वा प्रजासत्ताक दिन साजरा

**दैनिक युवक आधार**
**निफाड प्रतिनिधी**
**राहुल कुलकर्णी**



मविप्र समाज संस्थेचे,कर्मवीर गणपत दादा मोरे कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात,76 वा प्रजास्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

मविप्र सभापती बाळासाहेब क्षीरसागर यांच्या शुभहस्ते ध्वजपुजन व ध्वजारोहण करण्यात आले, या प्रसंगी डॉ. उत्तमराव डेर्ले, प्राचार्य प्रोफे.(डॉ.) सुरेश जाधव, नंदलाल चोरडिया, माधवराव गीते,जानकीराम धारराव, भाउसाहेब कापसे,सुधाकर कापसे,बाळासाहेब सानप,तुषार खालकर,सचिन धारराव,योगेश कुंदे,संदिप गाजरे,रामनाथ धारराव,प्रवीण कराड, जयंतीलाल दुधेडीया,प्रमोद निखाडे,प्रकाश बाफना,अभय सुराणा आदी मान्यवर उपस्थित होते. या प्रसंगी प्राचार्य डॉ. एस.व्ही. जाधव यांनी उपस्थितांचे स्वागत करीत, सर्वांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. राष्ट्रगीताच्या वेळी सर्वांनी भारतीय ध्वजाला सलामी दिली.

या कार्यक्रम प्रसंगी *महाविद्यालयास रूपये ५२ हजार रूपये किंमतीचे २० सिमेंटची बैठक बाके देणारे देणगीदार नंदलालजी चोरडीया यांचा सत्कार सभापती बाळासाहेब क्षीरसागर यांच्या शुभहस्ते करण्यात आला.

एन.सी.सी. कॅडेट विध्यार्थानी शिस्तबध्द संचालन आणि परेड करीत सर्व मान्यवरांना मानवंदना दिली. कार्यक्रमाच्या यशस्वीततेसाठी शा. शिक्षण संचालक चंद्रशेखर मोरे, लेप्टनंट एस.बी.गायकवाड, क्रीडा शिक्षक सी.ए.कुंदे, एनसीसी चे कॅडेट, सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर सेवक यांनी विशेष परीश्रम घेतले.

या कार्यक्रमास निफाड चे ग्रामस्थ, सभासद, हितचिंतक, सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर सेवक, पालक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

## लॉंगमार्च नेते आशिष वाकोडे यांना जातीवादी समाजकंटकाकडून गाडी अंगावर घालून मारण्याचा झाला प्रयत्न...

**दैनिक युवक आधार**
**जालना(अशोक ठोके)**

17 जानेवारी 2025 रोजी विजय बाबा वाकोडे यांचे सुपुत्र आशिष वाकोडे व अविनाश सूर्यवंशी यांच्या नेतृत्वात परभणी ते मुंबई पर्यंत निघालेला लॉंग मार्च आज जालना जिल्ह्यातील नागेवाडी येथून पुढे निघाला होता,या लॉंग मार्च मध्ये सामील झालेल्या आंबेडकरी समाजाला तसेच शहीद विजय बाबा वाकोडे, सोमनाथ सूर्यवंशी व स्वर्गीय संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांना तसेच आंबेडकरी समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी हा लॉंग मार्च



मुंबईच्या दिशेने अत्यंत शांततेच्या मार्गाने मंत्रालयावर कूच करत होता तेवढ्यात जालना औरंगाबाद रोडवरील शेलगाव जवळ एक भरधाव वेगाने आलेली चार चाकी गाडी जातीवाद्याकडून अंगावर घालण्याचा प्रयत्न झाला, परंतु आशिष वाकोडे यामध्ये बाल बाल बचावले आहेत.त्यांना तातडीने कार्यकर्त्यांनी जालना येथील डॉ.आशिष राठोड यांच्या नवजीवन हॉस्पिटल येथे दाखल करण्यात आले, तेथे त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.आमचे प्रतिनिधी अशोक ठोके यांनी लॉंग मार्च चे नेते आशिष वाकोडे यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधला असता त्यांच्या उजव्या हाताला गंभीर अशी दुखापत झाली असून त्यांचा उजवा हात वर उचलत नसल्याचं त्यांच्याकडून सांगण्यात येत आहे. त्यांना डॉक्टरांनी पंधरा दिवस बेल्ट लावण्यासाठी दिला असून त्यांच्या उजव्या हाताला मुंग्या येत असल्याच देखील त्यांच्याकडून सांगण्यात आलं आहे. त्यांची प्रकृती सध्या स्थिर आहे.हा जातीवादी आरोपी व त्याची चार चाकी गाडी बदनापूर पोलिस ठाण्यात जमा असल्याचं आशिष वाकोडे यांच्याकडून सांगण्यात आलं आहे. भीमराव दादा हत्तीआंबिरे,सुधीर भाऊ साळवे, रवि सोनकांबळे, सिद्धार्थ भराडे, सचिन पाचपुंजे, अमोल भालेराव, विश्वजित वाघमारे, राहुल मकरंद व महाराष्ट्रातील संपूर्ण आंबेडकरी समाज हा त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे.

# वित्तीय व डिजिटल साक्षरता जागतिक कार्यक्रम ,

**दैनिक युवक आधार**
**सचिन बन्सोड गोंदिया**

दि27/01/2025 गोंदिया जिल्हा. तालुका अर्जुनी मोरगाव गाव निमगाव इथं ग्रामपंचायत सभागृह कार्यक्रम पार पडला. राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँक (नाबार्ड) व दि. गोंदिया डिस्ट्रिक्ट सेंट्रल को आपरेटिव्ह बँक गोंदिया यांच्या संयुक्त विद्यमाने वित्तीय व डिजिटल साक्षरता जागृती कार्यक्रम घेण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. अविनाश लाड साहेब, जिल्हा विकास मॅनेजर (डी. डी. एम. ) नाबार्ड गोंदिया. प्रमुख पाहुणे मा. नरेंद्र जी मडावी,




एल. डी. एम. साहेब, बँक ऑफ इंडिया, मा. वंदेश्वरी राऊत (सरपंच), मा. संदीप पुसतोडे ( उपसरपंच ), मा. गजानन जी पुसतोडे (अध्यक्ष) सेवा सहकारी सोसायटी, मा. गायधणे साहेब, (सचिव ) सेवा सहकारी सोसायटी, मा. शालू कोल्हे (अध्यक्ष ग्रामसंघ ) महिला बचत गट ), तसेच महिला बचत गट (आय. सी. आर. पी.) विद्या पुसतोडे , ज्योत्सना सहारे व (पशुसखी) फुलन बांबोर्डे, (मत्ससखी ) वर्षा गेडाम, कृषी सखी, वंदना कोल्हे, लेखापाल संगीता कापगते, बँक सखी शुभांगी कान्हेवार, व सर्व ग्रामस्थ, महिला बचत गटाच्या महिला उपस्थित होते, या कार्यक्रमात विद्येची क्रांती ज्योती सावित्री बाई फुले यांचे प्रतिमेचे पूजन करण्यात आले. नंतर व कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. अविनाश लाड डी. डी. एम.यांचे पुस्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले, तसेच प्रमुख पाहुण्यांचे पुस्पगुछ देऊन स्वागत करण्यात आले. अध्यक्ष मार्गदर्शनात मा. अविनाश लाड सर यांनी आपल्या मार्गदर्शनात सर्व महिला तसेच ग्रामस्थ यांना सुरक्षा विमा योजना, जीवन ज्योती विमा योजना, नाबार्ड बँक चे कार्य, सेवा सहकारी सोसायटी चे कार्य, शेतकरी ना क्रॉप लोन माहिती, शेती विमा योजना, किसान क्रेडिट कार्ड, बँक लोन, डिजिटल बँकिंग, मोबाईल बँकिंग, या सर्व विषयावर मार्गदर्शन करण्यात आले. तसेच यशस्वी पणे कार्यक्रम संचालन करण्यात आले. कार्यक्रमाला आभार प्रदर्शन सी आर पी वर्षा गेडाम यांनी मानले. सर्व महिला बचत गटाच्या महिला उपस्थित होते, अस्या प्रकारे कार्यक्रम समापन करण्यात आले.

# निवळी ग्रामपंचायत व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भारतीय प्रजासत्ताक दिवस उत्साहाने साजरा करण्यात आला आहे

**दैनिक युवक आधार**
**नांदेड प्रतिनिधी**
**चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर**

भारतीय प्रजासत्ताक दिवस हा भारताच्या प्रजासत्ताकात दरवर्षी २६ जानेवारी रोजी पाळला जाणारा राष्ट्रीय दिन आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना भारताचे संविधान समितीने २६ नोव्हेंबर, इ.स. १९४९ रोजी स्वीकारले व २६ जानेवारी इ.स. १९५० रोजी पासून भारतीय संविधान अंमलात आले. जवाहरलाल नेहरू यांनी ३१ डिसेंबर, इ.स. १९२९ रोजी लाहोरजवळ रावी नदीच्या काठी अशोक चक्रांकित तिरंगा ध्वज फडकावून पूर्ण प्रजासत्ताकाची स्वातंत्र्याची घोषणा केली होती.त्याची आठवण म्हणून २६ जानेवारी हा दिवस राज्यघटना अंमलात आणण्यासाठी निवडण्यात आला. या दिवशी देशभरात भारताच्या राष्ट्रध्वजाचे आरोहण होऊन त्याला वंदना दिली जाते.भारताचे राष्ट्रगीत म्हणले जाते आणि आदर व्यक्त केला जातो. हा दिवस आपल्या देशातील सुवर्ण दिन आहे. या दिवसाची प्राप्ती हजारो देशभक्तांच्या बलिदानातून झाली होती नांदेड मुखेड तालुक्यातील निवळी ग्रामपंचायत व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा निवळी येथील भाषणाचे कार्यक्रम




आयोजित करण्यात आला आहे शाळेचे मुख्याध्यापक कदम सर माकणीकर शिक्षिका राठोड मॅडम यांच्या माध्यमातून निवळी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा महाराष्ट्र शासन महा वाचन उत्सव 2024 विद्यार्थ्यांना शालेय शिक्षण मंत्री, माजी मुख्यमंत्री तथा उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्या माध्यमातून प्रमाणपत्र प्राप्त झाले विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले निवळी गावचे विजय पाटील घोनसे जिल्हा मध्यवर्ती बँक धाराशिव अधिकारी यांनी विद्यार्थ्यांचे भाषण व त्याची गुणवत्ता पाहून वही व पेना वाटप केले असून सर्व ग्रामपंचायत निवळी सरपंच शिवसमप्पा मठपती यांच्या हस्ते राष्ट्रीय ध्वजा ला सलामी, व उपसरपंच संभाजी पाटील माळेगाव ग्रामसेवक येवतीकर सोसायटी चेअरमन भास्कर पाटील नेवळे संदिप पाटील नेवळे मनोज मठपती सर मारोती पाटील काटेवाडे राजू पाटील सुर्यवंशी पोलिस पाटील निवळी तिरुपती पपुलवाड शशिकांत निवळीकर कैलास दहिकाबळे विठ्ठल कांबळे विजू महाराज बाऱ्हाळे अंगणवाडी सेविका व सर्व मदतनीस आशा वर्कर ग्रामपंचायत सेवक पत्रकार पपु वाघमारे निवळीकर उपस्थित सर्व गावकरी प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते

## बीके डॉ शुभदा नील यांच्या हस्ते मान्यवरांचा नील हॉस्पिटल येथे सन्मान

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**

दैनिक युवक आधार नववर्ष दिनदर्शिकेचा प्रकाशन सोहळा शनिवार दि. 25 जानेवारी. २०२५ रोजी नील हॉस्पिटल सेक्टर एक पनवेल येथे जल्लोषात संपन्न झाला. दैनिक युवक आधारचे संपादक संतोष आमले यांचे उत्तम नियोजन, प्रचंड मेहनत आणि आई ग्रुपच्या ऐक्याचा सामाजिकतेचा प्रचंड असा महामेरू यामुळे दैनिक युवक आधार वृत्तपत्राचा दिनदर्शिका सोहळा जल्लोषात संपन्न झाला. यावेळी प्रसिद्ध स्त्रीरोग, कॅन्सर आणि गर्भ संस्कार तज्ञ बीके डॉ शुभदा नील यांच्या हस्ते खान्देश्वर पोलीस स्टेशन वरिष्ठ पोलीस निरिक्षक स्मिता ढाकणे, पनवेल वाहतुक विभाग वरिष्ठ पोलिस निरिक्षक संजय पाटील, डॉ शितल गोसावी, निलम दाते दिशा महिला मंच, साक्षी सागवेकर अध्यक्ष परिणीता फाउंडेशन, दैनिक युवक आधारचे संपादक श्री व सौ भारती संतोष आमले आणी अनेक मान्यवरांचा नील हॉस्पिटल येथे सन्मान करण्यात आला. बीके डॉ शुभदा नील यांनी अध्यातम्यातून आरोग्य ह्या विषयावर सर्वांना मोलाचे मार्गदर्शन केले.




दैनिक युवक आधार (RNI NO :- MAHMAR/2023/89514) हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR (RNI NO :- MAHMAR/2023/89514) Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# रोहा अष्टमी अर्बन बँकेची इमारत बिल्डरच्या घशात

- चार कोटींची मालमत्ता अवघ्या एक कोटीत
- बिल्डरचे नातेवाईकच बँकेचे डिफॉल्टर
- खा.तटकरेंचा सहकार मंत्र्यांना फोन

**रोहा :** रायगड जिल्ह्यातील रोहावासियांची अस्मिता असलेली रोहे अष्टमी अर्बन बँक कवडीमोल भावाने बिल्डरला विकण्यात येत असून या बँकेतील ठेवीदारांना व भागधारकांना विश्वासात न घेता नियमबाह्य पद्धतीने बिल्डरला विकण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी रोह्यातील सर्व पक्षीय नागरिकांनी आवाज उठवत आंदोलनाचा इशारा दिला. खासदार सुनील तटकरे यांनी नागरिकांच्या आक्रोशाची गंभीर दखल घेत थेट राज्याचे सहकार मंत्री यांना फोन करून या विक्री संदर्भात स्थगिती देण्याची विनंती केली. दरम्यान, आक्रोश समितीचे समीर शेडगे, नितीन परब आणि अमित घाग यांनी बँक लिलावात झालेल्या अनियमिततेची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी अशी मागणी केली आहे.



रोहा अष्टमी अर्बन बँकेच्या इमारतीसह जमीन कवडीमोल भावात बिल्डरच्या घशात घातली आहे. या मालमत्तेची किंमत चार कोटी असताना अवघ्या एक कोटी दहा हजार रुपयात हा व्यवहार करण्यात आला. विशेष म्हणजे बिल्डरचे नातेवाईक रोहा अष्टमी अर्बन बँकेचे डिफॉल्टर असतानाही निविदा प्रक्रियेत अफरातफर करून हा व्यवहार केल्याचा आरोप होत आहे.

रायगड जिल्ह्यात एकेकाळी अग्रगण्य असलेली रोहा अष्टमी अर्बन बँक थकीत कर्जदारांमुळे बुडाली. २००७ साली अवसायानात निघालेल्या रोहा अष्टमी अर्बन बँकेकडून १२ हजार १० शेअर होल्डरना जवळपास वीस कोटी रुपये देणे बाकी आहे. यामध्ये नगर परिषदेचे २ कोटी ३८ लाख रुपये तर इतर बँक व बोला पतसंस्थांची चार कोटी रुपयांची इमारत व जमीन अवघ्या एक कोटी दहा हजार रुपयात विक्री केल्याचे उघडकीस आले आहे.

> मालमत्तेची विक्री करताना सर्व ठेवीदारांना पूर्वसूचना देणे बंधनकारक असताना या व्यवहारामध्ये भागधारकांची आणि ठेवीदारांची फसवणूक केलेली आहे. संपूर्ण व्यवहार संशयास्पद असून या निविदा प्रक्रियेला ठेवीदारांची हरकत आहे. या संपूर्ण प्रक्रियेला कायदेशीर आव्हान देऊन दोषींवर गुन्हे दाखल करण्यासाठी प्रयत्न करणार आहोत.
>
> – ॲड. महेंद्र पाटील, माजी चेअरमन

मुख्यालय ही बँकेची शेवटची मालमत्ता होती. मात्र ही मालमत्तादेखील कमी भावात विकल्याने ठेवीदारांचे पैसे देणार कसे, असा सवाल केला जात आहे. ठेवीदारांना अंधारात ठेवून लपूनछपून व्यवहार झाला आहे.

निविदा भरण्याची अंतिम तारीख उलटून गेल्यावर दीड महिन्यांनी ३ डिसेंबर रोजी निविदा फॉर्म फी जमा केली आहे. विशेष म्हणजे कुठल्याही निविदाधारकांच्या इसारा रक्कम जमा झाल्या नाहीत.

निविदा मंजूर होताच निविदाधारकाने निविदेच्या १५ टक्के रक्कम खात्यात भरणा करणे गरजेचे होते. निविदाधारकाने अशी कोणतीही रक्कम बँक खात्यात जमा केलेली नाही.






**दैनिक युवक आधार -** प्रसिद्ध स्त्रीरोग, कॅन्सर आणि गर्भ संस्कार तज्ञ बीके डॉ शुभदा नील यांच्या हस्ते नील हॉस्पिटल येथे प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला.



**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी संदेश बांदल माणगाव -** जय हनुमान क्रिकेट क्लब उतेखोल वाडी वतीने सालाबाद प्रमाणे याही वर्षी क्रिकेट चे सामने खेळवण्यात आले फायनल राऊंड रोहित इलेव्हन या संघाने फर्स्ट प्राइस फटकावला त्यावेळी त्यांचे सन्मान व त्यांचे टीम यांना ट्रॉफी सन्मानचिन्ह देऊन त्यांच्या अभिनंदन केले




**दैनिक युवक आधार -** 26 जानेवारी निमित्त झेंडावंदन करून पुढील कार्यक्रमाला सुरुवात झाली या ठिकाणी अनेक गुणवंत आदर्श प्रामाणिक तसेच व्यसन सोडून देणाऱ्या रिक्षाचालकांचा सन्मान करण्यात आला व रिक्षा स्टॅन्ड येथे निवारा शेड व सूचना फलकाचे उद्घाटन आपला माणूस श्री दिलीप किसनराव आमले व् व्यसनमुक्ती जनजागृती व सर्व रिक्षाचालकांच्या उपस्थितीमध्ये केले यावेळी आर एस चे श्री यादव श्री शुक्ला श्री उत्तम आंबवडे सहसचिव व रिक्षा स्टॅन्ड प्रतिनिधी श्री पप्पू जैस्वाल जितेंद्र उपाध्यय रवी शर्मा मधुकर लोखंडे उमाकांत राऊत अमित विश्वास स्टॅन्ड वरील सर्व सभासद तसेच नेरूळ सानपाडा जुईनगर या विभागातील अनेक स्टॅन्ड प्रतिनिधी व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते रिक्षा सर्व रिक्षा चालकांना आपला व्यवसाय जबाबदारीची जाणीव ठेवून करावा व्यसनापासून दूर राहावे तसेच आज या ठिकाणाहून रस्ता सुरक्षा व व्यसनमुक्ती जनजागृती या उपक्रमाची सुरुवात होऊन नवी मुंबई मधील प्रमुख रिक्षा टॅक्सी स्टॅन्ड या ठिकाणी स्वतः आपला माणुस व सहकारी जाऊन रस्ता सुरक्षा बाबतीत माहिती पुस्तिका वाटप करून जनजागृती करणार आहे

# बेलवाडी येथील ग्रामपंचायतसमोर प्राजकसत्ताक दिन साजरा

**दैनिक युवक आधार**
**सणसर :- विकास क्षत्रिय**

इंदापूर तालुक्यातील बेलवाडी ग्रामपंचायतीचे ध्वजारोहण बेलवाडी गावच्या सरपंच सौ मयुरी ताई शरद जामदार यांच्या शुभहस्ते संपन्न झाले.तर बेलवाडी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे ध्वजारोहण राष्ट्रवादी कॉंग्रेसचे युवा नेते व बेलवाडी ग्रामपंचायतीचे विद्यमान सदस्य श्री पंकजभैया सर्जेराव जामदार यांच्या हस्ते पार पडले. जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या वतीने गावातून प्रभात फेरी काढण्यात आली.यावेळी बेलवाडी शाळेतील मुलांचा जिल्हास्तरावर लेझीम स्पर्धेत तृतीय क्रमांक व मुलींचा तालुकास्तरावर द्वितीय क्रमांक आल्याने सर्व यशस्वी मुलामुलींचा सत्कार उपस्थित प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आला. प्रजासत्ताक दिनानिमित्त पहिली ते चौथीच्या विद्यार्थी व विद्यार्थिनींनी लेझीम प्रात्यक्षिक देशभक्ती गीतांवर नृत्य सादर केले यावेळी बेलवाडी गावचे माजी पोलीस पाटील अरविंद जाधव यांनी शाळेस 18 हजार रुपये किमतीचा स्पीकर सेट भेट दिला. जिल्हास्तरावर व तालुकास्तरावर विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन यश संपादन केले त्या सर्व मार्गदर्शक शिक्षकांचा सत्कार ग्रामपंचायतीच्या वतीने करण्यात आला.यावेळी बेलवाडी गावच्या सरपंच सौ मयुरीताई शरद जामदार,तलाठी शिवाजी खेनट,ग्रामविकास अधिकारी मृगेंद्र करचे ,शिवसेनेचे माजी उपजिल्हाप्रमुख प्रकाश शेळके,उपसरपंच नामदेव इथापे, ग्रामपंचायत सदस्य दादासो गायकवाड,हनुमंत खैरे,पैलवान हनुमंत यादव,ज्योतीराम जामदार ,सविता जामदार,प्रवीण शेळके,प्रकाश दादा खैरे,दत्तात्रय जाधव स्वाती जामदार,लक्ष्मणराव भिसे व इतर स्थानिक ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमास उपस्थित असलेल्या सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनींना ग्रामपंचायत,विविध कार्यकारी सोसायटी व स्थानिक सामाजिक कार्यकर्ते सुनील पवार यांच्या वतीने मोफत खाऊचे वाटप करण्यात आले.हा संपूर्ण कार्यक्रम यशस्वी व्हावा यासाठी शाळेच्या शिक्षिका स्नेहल भरत गायकवाड,
श्री महादेव घोळवे,सौ नुतन लोंढे,सौ विद्या भोसले,व शाळेचे मुख्याध्यापक श्री किरण भोसले सर यांनी विशेष परिश्रम घेतले.



# विचुंबे ग्रामपंचायत मार्फत दिव्यांग व महिलांना साहित्य वितरण वाटप कार्यक्रम

दैनिक युवक आधार
सुरेश भोईर (कार्यकारी संपादक)

25 जानेवारी रोजी रा. जि.प.शाळा विचुंबे येथे मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी सरपंच प्रमोद भिंगारकर, उपसरपंच स्वाती पाटील, सदस्य समीर दुन्द्रेकर, सतीश म्हात्रे, करुणा म्हात्रे, भरत पाटील, सुनील सोनवळे, अनिल भोईर, श्रावणी भोईर, प्रगती गोंधळी, अतुल भोईर, आरती गायकवाड, विभूती सुरते, अनंता गायकवाड, धनश्री भोईर, संचिता पाटील, ग्रामसेवक गणेश गायकर यांच्यासह सदस्य उपस्थित होते. यावेळी महिला बचत गटांना व्यवसाय वाढीसाठी साहित्य वाटप, दिव्यांग व्यक्ती यांना साहित्य वाटप आणि कचरा संकलन करता घरगुती डस्टबीन वाटप करण्यात आले. विचुंबे परिसरात नागरिकीकरण झपाट्याने वाढत आहे. ग्रामपंचायत मार्फत विविध सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात येतात. बचत गटाला वाटप करण्यात आलेल्या साहित्य वाटपातून बचत गटाला काहीतरी फायदा झाला पाहिजे असे सरपंच प्रमोद भिंगारकर यांनी सांगितले. महिला बचत गट यांना व्यवसाय करण्यासाठी साहित्य वाटप करण्यात आले असून त्यातून त्यांना उत्पन्न मिळून त्यांचा व्यवसाय वाढला पाहिजे. यावेळी महिला बचत गटातील सर्व महिला बहुसंख्येने उपस्थित होत्या असेही भिंगारकर यांनी सांगितले.





## प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून कल्पतरू रिव्हर साईटमध्ये स्पोर्ट्स वीकचे भव्य आयोजन

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल :** 26 जानेवारीचा प्रजासत्ताक दिन हा आपल्या देशाच्या लोकशाही परंपरेचा आणि राष्ट्रीय एकतेचा उत्सव आहे. या विशेष दिनाचे औचित्य साधून कल्पतरू रिव्हर साईट येथील रहिवाशांनी स्पोर्ट्स वीकच्या माध्यमातून एकत्र येत नागरिकत्वाचे उत्कृष्ट उदाहरण घालून दिले आहे. कल्पतरू रिव्हर साईटमधील बिल्डिंग नंबर 1, 2, 3, 4 आणि वॉटर फ्रंट या पाच वसाहतींमध्ये मिळून 840 सदनिका आहेत. येथे दरवर्षीप्रमाणे आयोजित होणाऱ्या स्पोर्ट्स वीकमध्ये यावर्षी 5 ते 70 वर्षे वयोगटातील 574 खेळाडूंनी उत्साहाने भाग घेतला. विविध खेळांमध्ये सहभाग घेताना सर्व वयोगटातील रहिवाशांनी संघभावना, मैत्री, आणि एकता यांचा उत्तम परिचय दिला. बॉक्स क्रिकेट, बॅडमिंटन, स्विमिंग, बुद्धिबळ, कॅरम, फुटबॉल, डॉजबॉल, टेबल टेनिस, धावणे, पुस्तक डोक्यावर ठेवून चालणे, आणि बेडूक उडी, स्लो सायकलिंग, जिम इव्हेंट्स, सुडोकू, म्युझिकल चेअर हे खेळ खेळले गेले. हा कार्यक्रम दरवर्षी राबवण्यात येतो आणि या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी कल्पतरू च्या तिन्ही सोसायटीच्या संपूर्ण मॅनेजिंग कमिटी च्या अधिपत्याखाली स्थापित झालेली सांस्कृतिक समितीचे योगदान अत्यंत महत्त्वाचे ठरले. समितीमध्ये सीमा ठाकूर, पूजा सिंग, सप्तमी साहा, प्राजक्ता पाटील, आणि आशा पॉल यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. या वर्षीचा स्पोर्ट्स वीक पुरस्कार समारंभ सन्माननीय आमदार प्रशांत दादा ठाकूर आणि परेश दादा ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. तसेच, बिल्डिंग 1 आणि 2 चे चेअरमन श्री प्रशांत बाळाराम ठाकूर, बिल्डिंग 3 आणि 4 चे चेअरमन श्री ब्रह्माजी, श्री मनोज महादेव आंग्रे, आणि श्री भार्गव रामदास ठाकूर यांच्या नेतृत्व आणि मार्गदर्शनाखाली उत्तम रीतीने कार्यक्रम राबविण्यात आला यामुळे नक्कीच रहिवाशांना प्रोत्साहन मिळेल.

**एकसंघतेचा आदर्श**
कल्पतरू रिव्हर साईटमधील रहिवाशांनी प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने खेळांमधून एकात्मतेचा व आनंदाचा संदेश दिला आहे. विविध वयोगटातील नागरिक एकत्र येऊन देशभक्तीच्या आणि सामाजिक सलोख्याच्या भावनेला पूरक असा हा उपक्रम एक आदर्श घालून देणारा ठरला आहे. कल्पतरू रिव्हर साईटचा हा उपक्रम राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देत प्रत्येक नागरिकाने सजग व एकजूट राहण्याचा आदर्श निर्माण केला आहे.

# आझाद मैदान सभास्थळी पाकिटमारी करुन पैसे व मोबाईल चोरलेल्या चोरटयांना केले जेरबंद 03 गुन्हे उघडकिस


**दैनिक युवक आधार**
**मराठवाडा विभागः-**
**राजु शिंदे.**

दिनांक 25/01/2025 रोजी पोलीस ठाणे सदर बाजार हद्दीत मा. एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांचा आझाद मैदान जालना येथे सभा असल्याने गर्दीच्या ठिकाणी काही लोकांचे खिशातील पाकिट, व रोख रक्कम चोरीस गेल्याची फिर्याद हि फिर्यादी नामे केतन शाम लखनव वय 30 वर्ष रा. प्रियदर्शनी कॉलनी, संभाजी नगर, जालना व ईतर तक्रारदार यांनी फिर्याद दिली होती. यावरुन पोस्टे सदर बाजार जालना येथे अज्ञात आरोपी विरुद्ध गुरनं. 66/2025 कलम 303(2) भा.न्या. सं प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्याअनुषंगाने गुन्हा उघडकीस आणणे बाबत मा. पोलीस अधीक्षक श्री. अजयकुमार बंसल साहेबांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव यांना सुचना दिल्या होत्या. त्याअनुषंगाने पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा जालना यांनी पथकातील अधिकारी व अंमलदार यांना पाकीटमार चोरीचा गुन्हा उघडकीस आणणेबाबत सुचना देवुन मार्गदर्शन केले होते. त्या अनुषंगाने वरील स्टाफ यांनी कार्यक्रमाचे ठिकाणी गर्दीच्या पाकिटमार ईसमांचे शोध घेत असतांना पथकास गुप्तबातमीदारा मार्फत माहिती मिळाली की, सदर चे पाकीट चोरी हि 1) सचिन विष्णु खामकर वय 38 वर्षे राहणार प्रेमदान हडको सावेडी अहमदनगर 2) ईरफान जब्बार शेख वय-37 वर्षे राहणार पवारवस्ती दापोडी चौक पुणे 3) अर्जुन अंकुश शिंदे वय-21 वर्षे राहणार रामकृष्णनगर परभणी, 4) सोनु दत्तु गायकवाड वय 23 वर्ष रा. कैकाडी मोहल्ला जालना 5) सव्यद ईरफान सय्यद उस्मान वय 30 वर्ष रा. किराडपुरा, जाली दर्गा, छत्रपती संभाजी नगर 6) फिरदोस खाँन रऊफ खाँन वय 40 वर्ष रा. रोशन गेट, छत्रपती संभाजी नगर 7) विकास उर्फ खारट अशोक गायकवाड वय 30 वर्ष रा. लालबाग जालना यांनी केलेली आहे. अशी खात्रीलायक बातमी मिळाल्याने वरील स्टाफ यांनी सदर इसमांचा शोध घेवून त्यांना ताब्यात घेवुन त्यांना गुन्हया संबंधी विचारपुस करता त्यांनी वरील गुन्हा केल्याची कबुली दिली. त्यांची अंगझडती घेतली असता त्यांच्याक्हुन 26,500/- रु किंमतीची रोख रक्कम व मोबाईल असा मुददेमाल जप्त करण्यात आला आहे. तसेच पोलीस ठाणे सदर बाजार हददीतील बसस्टॅण्ड येथे पाच महिन्यापुर्वी गर्दीचा फायदा घेत बस मध्ये चढ़त असलेल्या इसमाचे खिशातुन पाकिट मारुन 39000/- रु चोरी केल्याची कबुली दिली असुन त्यामध्ये सदर बाजार पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. 748/2024 कलम 303(2) भ्या. न्या. सं. अन्वये गुन्हा दाखल असुन सदर गुन्हा उघडकीस आणला आहे. तसेच पोलीस ठाणे सदर बाजार हददीतील बसस्टैण्ड येथे दोन महिन्यापुर्वी गर्दीचा फायदा घेत बस मध्ये चढत असलेल्या इसमाचे खिशातुन पाकिट मारुन 28000/- रु चोरी केल्याची कबुली दिली असुन त्यामध्ये सदर बाजार पोलीस ठाणे येथे गुर.क्र. 1125/2024 कलम 303(2) भ्या. न्या. सं. अन्वये गुन्हा दाखल असुन सदर गुन्हा उघडकीस आणला आहे. सदरची कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री. अजयकुमार बंसल व मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. आयुष नोपाणी उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. अनंत कुलकर्णी उपविभाग जालना यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे मा. पोलीस निरीक्षक श्री पंकज जाधव सपोनि योगेश उबाळे, पोउपनि राजेंद्र वाघ, पोलीस अंमलदार गोपाल गोशिक, रमेश राठोड ईर्शाद पटेल, सतिश श्रीवास, आकूर धांडगे, संदीप चिचोले, रमेश काळे व चालक मुळे यांनी केली आहे.



# जोगेश्वरी स्टेशन मॅनेजरला निवेदन सादर

**दैनिक युवक आधार**
**किशोर गुडेकर मुंबई, प्रतिनिधी प्रमुख**





महाराष्ट्र रेल्वे प्रवासी महासंघाचे अध्यक्ष आणि सेंट्रल रेल्वे कमिटी सदस्य (ZRUCC Member) श्री. अभिजीत धुरत यांच्या मार्गदर्शनाखाली महासंघाचे जोगेश्वरी स्टेशन अध्यक्ष किशोर गुडेकर यांनी जोगेश्वरी स्टेशन मॅनेजर शंभुनाथ सर यांची भेट घेतली. या भेटीत हार्बर ते वेस्टर्न रेल्वे मार्ग जोडण्यासाठी आवश्यक असलेल्या पुलाच्या (ब्रिज) उभारणीसाठी प्रवाशांच्या तक्रारींचे निवेदन सादर करण्यात आले. प्रवाशांना दररोज होणाऱ्या गैरसोयींबाबत, दोन मार्गांदरम्यान जलद आणि सुरक्षित प्रवासाच्या सुविधेची मागणी करण्यात आली. या पुलामुळे प्रवाशांचा वेळ वाचेल तसेच गर्दी कमी होईल, असेही निवेदनात नमूद करण्यात आले. स्टेशन मॅनेजर शंभुनाथ सर यांनी या मागणीची गंभीर दखल घेतली असून, प्रस्ताव वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे पाठवला जाईल, असे आश्वासन दिले. तसेच, हा विषय प्राधान्याने सोडवण्याचे प्रयत्न करण्यात येतील, असे सांगितले. या उपक्रमामुळे हार्बर व वेस्टर्न रेल्वे मार्गांवरील प्रवाशांना दिलासा मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. महाराष्ट्र रेल्वे प्रवासी महासंघ प्रवाशांच्या समस्यांसाठी

# दैनिक युवक आधारच्या दिनदर्शिकेचा प्रकाशन सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न



























www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज
दैनिक **युवक आधार** मराठी

दै. युवक आधार करीता
प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापुर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले | श्री. सुरेश आत्माराम भोईर

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : १३४ वा मंगळवार दि. 28 जानेवारी २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514

# दैनिक युवक आधारच्या दिनदर्शिकेचा प्रकाशन सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न



















